दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | शुक्रवार, 24 जुलै 2026 | अंक क्र. 78 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# लातूर-रेणापूर-धर्मापुरी बस सेवेचा आ. कराड यांच्या हस्ते शुभारंभ

■ लातूर प्रतिनिधी

लातूर, रेणापूर, पानगाव, धर्मापुरी या मार्गावर नव्याने सुरू करण्यात आलेल्या बससेवेचा भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते २२ जूलै रोजी रेणापूर येथे करण्यात आला असून या सेवेमुळे रेणापूर, पानगाव परिसरातील प्रवाशांची मोठी सोय होणार आहे.

गेल्या अनेक दिवसापासून लातूरहून धर्मापुरीकडे जाणारी बस सेवा सुरू करण्यात यावी अशी मागणी सातत्याने नागरिकातून केली जात होती. रेणापूर, पानगाव या भागातील जनतेला परळी अहमदपूर गंगाखेड जाण्यासाठी अडचणी येत होत्या. प्रवाशांची गैरसोय लक्षात घेऊन आ. रमेशआप्पा कराड यांनी संबंधितांना सूचना केल्याने सदरील लातूर, रेणापूर, पानगाव, धर्मापुरी या मार्गावर नव्याने बस सेवा सुरु करण्यात आली आहे.

या बस सेवेचा शुभारंभ रेणापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज महाराज महाराजस्व अभियानाच्या निमित्ताने लातूर ग्रामीणचे आ. श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते करण्यात आला. याप्रसंगी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, भागवत सोट, जिप महिला व बालकल्याण सभापती शिवकन्या गोडभरले, रेणापूरच्या नगराध्यक्षा शोभाताई अकनगिरे, पंस सभापती मोनिका सूर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर, तहसीलदार प्रशांत थोरात, सौदागर तांदळे, गटविकास अधिकारी श्याम गोडभरले, महादेव साळुंखे, सुरज शिंदे, सतीश आंबेकर, बन्सी भिसे, अभिषेक अकनगिरे, महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, सुकेश भंडारे, राजकिरण साठे, अशोक राठोड, दत्ता सरवदे, विजय चव्हाण, अच्युत कातळे, महेश गाडे, राजू आलापूरे, उत्तम चव्हाण, महादेव घुले, श्रीमंत नागरगोजे, बाबासाहेब भिसे एसटी महामंडळाचे अधिकारी चालक वाहक यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## गुजरातमधील पुरात अडकलेल्या ३५ पर्यटकामध्ये परळीतील दोघांचा समावेश; सुखरूप सुटका

### आ. धनंजय मुंडे यांच्या कार्यालयाच्या तत्परतेने कुटुंबियांचा झाला संपर्क

■ परळी वैजनाथ | प्रतिनिधी

गुजरातमधील वलसाड जिल्ह्यात नदीला आलेल्या अचानक पुरामुळे महाराष्ट्रातील सुमारे ३५ पर्यटक अडकल्याची घटना घडली. मात्र, गुजरात प्रशासनाने तातडीने हेलिकॉप्टरद्वारे बचाव मोहीम राबवत सर्व पर्यटकांची सुखरूप सुटका केली. या पर्यटकांमध्ये परळी वैजनाथ येथील रुपेश झंवर व त्यांची पत्नी जान्हवी झंवर या दाम्पत्याचाही समावेश होता. या पूर परिस्थितीमध्ये अडकलेल्या या दाम्पत्यांचा संपर्क तुटला होता.त्यांच्याशी संपर्क होत नसल्याने नातेवाईक चिंताग्रस्त होते. मात्र याबाबत आ.धनंजय मुंडे यांच्या कार्यालयाने तातडीने संबंधित गुजरात प्रशासनाशी संपर्क केला. संबधित छावणी व त्याठिकाणच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधत झंवर दाम्पत्यांचा संपर्क करून दिला.



खासगी ट्रॅव्हल बसने प्रवास करत असतांना वलसाड जिल्ह्यातील औरंगा नदीला आलेल्या पुरामुळे बसचा मार्ग बंद झाला आणि पर्यटक अडकून पडले. घटनेची माहिती मिळताच गुजरात प्रशासन, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग, स्थानिक यंत्रणा आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पुराच्या पाण्यामुळे रस्ता पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने हेलिकॉप्टरच्या साहाय्याने बचावकार्य राबविण्यात आले. एक-एक करून सर्व पर्यटकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. सर्व पर्यटक सुरक्षित असून कोणालाही गंभीर दुखापत झालेली नसल्याची माहिती प्रशासनाने दिली.

या घटनेमुळे महाराष्ट्रातील पर्यटकांच्या कुटुंबीयांमध्ये काही काळ चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. विशेषतः परळी वैजनाथ येथील झंवर दाम्पत्याशी संपर्क तुटल्याने त्यांच्या नातेवाईकांची चिंता वाढली होती. याबाबत माहिती मिळताच परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांच्या कार्यालयाने तातडीने पुढाकार घेत संबंधित यंत्रणांशी संपर्क साधला आणि झंवर दाम्पत्याचा त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क करून दिला. त्यानंतर त्यांच्या नातेवाईकांनी सुटकेचा निश्वास टाकला. अडचणीच्या प्रसंगी आपल्या मतदारसंघातील नागरिकांना तत्काळ मदत मिळावी यासाठी आमदार धनंजय मुंडे यांच्या कार्यालयाने संवेदनशीलतेने आणि तत्परतेने केलेल्या प्रयत्नांचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

## वंचितने पुकारलेल्या महाराष्ट्र बंदला परळीत उत्स्फूर्त प्रतिसाद, सर्वपक्षीयांचा मिळाला पाठिंबा

■ परळी वैजनाथ प्रतिनिधी

दिल्ली येथे 20 जुलै रोजी विद्यार्थ्यांच्या शांतता मार्चवर पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठीचार्ज विरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने महाराष्ट्र बंदची आवाहन करण्यात आले होते. या आवहानास परळीत उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. बंदला परळी तालुक्यातील विविध पक्षांनी आपला पाठिंबा देऊन निषेध नोंदविला.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांनी आज 23 जुलै रोजी महाराष्ट्र बंदचे आवाहन केले होते गेल्या 22 दिवसापासून जंतर-मंतरवर प्रसिद्ध शास्त्रज्ञ सोनम वांगचुक व अभिजित दिपके तसेच हजारो विद्यार्थी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत 20 जुलै रोजी संसदेवर काढलेल्या शांतता मार्चला पोलिसांनी लाठी चार्ज केला यामध्ये शेकडो विद्यार्थी जखमी झाले शालेय महाविद्यालय विद्यार्थी व विद्यार्थिनींना पोलिसांनी मारहाण केली यामध्ये अनेकांना गंभीर दुखापती झाले या घटनेच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीच्या वतीने महाराष्ट्र बंदचे आवाहन करण्यात आले होते या आवहनास परळीतील व्यापाऱ्यांनी आपले दुकाने बंद ठेवून प्रतिसाद दिला. शहरातील राणी लक्ष्मीबाई टॉवर येथे 11 वाजता सर्वपक्षीयांच्या वतीने निषेध सभा घेण्यात आली तसेच यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली तसेच केंद्र सरकारचा धिक्कार करण्यात आला या आंदोलनात...





राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री ना. श्री. देवेंद्र भाऊ फडणवीस यांना काल (दि.२२) झालेल्या जन्मदिनाच्या आज भेटून शुभेच्छा दिल्या. या भेटीत माझ्या परळी वैद्यनाथ विधानसभा मतदारसंघातील विविध विकास कामांच्या संदर्भाने सकारात्मक चर्चा केली.

## अतिरिक्त उद्योग संचालकपदी पदोन्नती झाल्याबद्दल बालासाहेब यशवंते यांचा उरूळी कांचन येथे भव्य सत्कार

■ पुणे /अंबाजोगाई प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या उद्योग विभागात अतिरिक्त उद्योग संचालक या प्र तिष्ठित आणि मानाच्या पदावर पदोन्नती झाल्याबद्दल आदरणीय मा. श्री. बालासाहेब त्रिंबक यशवंते यांचा प्रथमेश प्रॉपर्टीज ॲण्ड डेव्हलपर्स यांच्या वतीने उरुळी कांचन (जि. पुणे) येथे भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. या सोहळ्याला पुणे जिल्ह्यातील आदिवासी कोळी समाजासह विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**प्रथमेश प्रॉपर्टीज ॲण्ड डेव्हलपर्सच्या पुढाकाराने गौरव सोहळा; शिक्षण, उद्योग आणि समाज प्रगतीचा संदेश**

यावेळी प्रा. योगेशजी कस्तुरे यांनी आपल्या मनोगतात बालासाहेब यशवंते यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, "साहेबांचे आपल्या कामाप्रती असलेले समर्पण, कर्तव्यदक्षता, प्रामाणिकपणा आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करून त्यांनी गाठलेले यश हे प्रत्येक तरुणासाठी प्रेरणादायी आहे. समाजातील प्रत्येक कुटुंबाने शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देत आपल्या मुलांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. शिक्षण हाच समाजाच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे." प्रथमेश प्रॉपर्टीज ॲण्ड डेव्हलपर्स तसेच कोळी राष्ट्रसंघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बळीराजे वाघमारे यांनी आपल्या भाषणात समाजबांधवांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत सांगितले की, "आपल्या समाजातील प्रत्येक मुलाला दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे. समाज सुशिक्षित झाला तरच तो मुख्य प्रवाहात येईल. बालासाहेब यशवंते यांच्यासारखे अधिकारी भविष्यात हजारोंच्या संख्येने घडण्यासाठी सर्वांनी शिक्षणाला प्राधान्य द्यावे. त्याचबरोबर तरुणांनी उद्योग-व्यवसायाचे प्रशिक्षण घेऊन यशस्वी उद्योजक बनण्याचा संकल्प करावा."

यावेळी बळीराजे वाघमारे यांनी बालासाहेब यशवंते यांनी व्यस्त शासकीय कामकाजातून वेळ काढून सत्कार स्वीकारण्यासाठी उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचे विशेष आभार व्यक्त केले. तसेच पाऊस, वारा आणि उन्हाची पर्वा न करता मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करणाऱ्या सर्व मान्यवरांचे आणि समाजबांधवांचेही त्यांनी मनःपूर्वक आभार मानले.

या भव्य सत्कार सोहळ्यास साईशा डेव्हलपर्सचे सर्वेसर्वा गोपाळ यशवंते, कोळी राष्ट्रसंघाचे संस्थापक अध्यक्ष गोकुळ दादा कोळी, श्री डेव्हलपर्सचे किरण सोनवणे, ॲड. बालाजी सर्जे, नारायण सर्जे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष हानमंत जमादार, बालासाहेब वाघमारे, रघुराम टोंपे, विलास बेस्के, अशोक कांबळे, मच्छिंद्र वाघमारे, सुनील यशवंते, अशोक यशवंते, बाळासाहेब दसवंते, गणेश दसवंते, विठ्ठल कांबळे, बापू कोरे, बाळू यशवंते, अमित यशवंते, आशिष यशवंते यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सत्कार सोहळ्याच्या माध्यमातून बालासाहेब यशवंते यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला तसेच समाजात शिक्षण, उद्योग, स्वावलंबन आणि गुणवत्तापूर्ण नेतृत्व निर्माण करण्याचा प्रेरणादायी संदेश देण्यात आला.



## परळीत मंत्री ना .पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त मोफतनेत्र तपासणी व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

### नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचा गरजूंनी लाभ घ्यावा व शिबिरासाठी नाव नोंदणी करावी-नगरसेविका अश्विनी केंद्रे - राहुल केंद्रे यांचे आवाहन

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आनंदऋषीजी नेत्रालय, अहिल्यानगर व अरिहंत जैन सेवाभावी संस्था, परळी वैजनाथ यांच्या संयुक्त विद्यमाने परळीत मोफत कॉम्प्युटरद्वारे नेत्र तपासणी व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. परळी शहर व परिसरातील गरजू नागरिकांनी या शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा. वेळेत नेत्र तपासणी करून आपल्या डोळ्यांची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन गरजू रुग्णांनी शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन नगरसेविका सौ. अश्विनी राहुल केंद्रे व युवा नेते राहुल रामचरण केंद्रे यांनी केले आहे.

लोकप्रिय लोकनेत्या, महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री मा.ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक सेवा उपक्रमांतर्गत परळी शहर भारतीय जनता पक्षाच्या वतीने मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले. ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त नगरसेविका सौ.अश्विनी राहुल केंद्रे व युवा नेते राहुल रामचरण केंद्रे यांच्या पुढाकारातून आनंदऋषीजी नेत्रालय, अहिल्यानगर व अरिहंत जैन सेवाभावी संस्था, परळी वैजनाथ यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत कॉम्प्युटरद्वारे नेत्र तपासणी व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ना.पंकजाताई मुंडे या आपल्या कार्यातून सर्वसामान्य जनतेशी नाळ जोडणाऱ्या, समाजातील वंचित व गरजू घटकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने प्रयत्नशील असलेल्या लोकनेत्या म्हणून परिचित आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या पान 2 वर...

संपादकीय

# सहकार्याची परतफेड की आघाडी धर्माला बगल?

पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ हा नेहमीच राजकीयदृष्ट्या अतिशय संवेदनशील आणि बलाढ्य समजला जातो. पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, जिल्ह्यातील नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांचे निवडून आलेले सदस्य या निवडणुकीत मतदार असतात. त्यामुळे जिल्हापातळीवरील सत्तेचे खरे नियंत्रण कोणाकडे आहे, हे दाखवण्याची ही एक सुवर्णसंधी मानली जाते.

या निवडणुकीच्या घोषणेपासूनच महायुती आणि महाविकास आघाडी (मविआ) या दोन्ही बाजूंनी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली होती. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर शरद पवार गट आणि अजित पवार गट यांच्यासाठी हा मतदारसंघ प्रतिष्ठेचा बनला होता. त्यातच महायुतीमध्ये भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्याकडूनही या जागेवर दावा केला जात होता. मात्र, वरिष्ठ पातळीवर चर्चा होऊन ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार गट) सोडण्याचा निर्णय झाला.राष्ट्रवादी काँग्रेसकडून सुनील टिंगरे, दीपक मानकर, विलास लांडे, योगेश बहल आदी निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होते. पण, उमेदवारी मिळवण्यात विक्रम काकडे यांनी बाजी मारली. राष्ट्रवादीकडूनही विक्रम काकडे यांच्यावर विश्वास दाखवण्यात आला. विक्रम काकडे हे पार्थ पवार यांचे निकटवर्तीय मानले जातात. विक्रम काकडे हे बिनविरोध निवडून आल्याने पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस अशी थेट लढत पाहायला मिळाली नाही.

या निवडणुकीतील सर्वात मोठा ट्विस्ट म्हणजे महाविकास आघाडीने अखेरच्या क्षणी घेतलेली माघार! मविआकडून सुरुवातीला अत्यंत तगडा उमेदवार देण्याची तयारी सुरू होती. शरद पवार गटाने ही निवडणूक अत्यंत गांभीर्याने घेतली होती. मात्र, उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी कमालीच्या गुप्त घडामोडी घडल्या. काकडे आणि टिंगरे यांनी समोरासमोर बसूनच फॉर्म भरले. दुसऱ्या बाजूला जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रदीप कंद यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. तसेच विक्रम काकडे यांचे वडील संजय काकडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. भाजप आणि शिवसेनेच्या काही स्थानिक नेत्यांनी अपक्ष किंवा बंडखोर उमेदवार उभे करण्याची तयारी दर्शवली होती, तसेच राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही नाराज नेत्यांनीही बंडखोरीचा पवित्रा घेतला होता. अशा अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. मात्र, महायुतीतील वरिष्ठ नेत्यांच्या मध्यस्थीमुळे ही बंडखोरी शमवण्यात महायुतीला यश आले. अखेरच्या क्षणी सुनील टिंगरे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार श्रीकांत पाटील यांनी शरद पवार यांच्या सूचनेनुसार माघार घेतल्याने विक्रम काकडे यांचा विजयाचा मार्ग सुकर झाला. वास्तविक महाविकास आघाडीत काँग्रेस, ठाकरेसेना व राष्ट्रवादी असे तीन पक्ष आहेत. पण, ही जागा राष्ट्रवादीच्या वाट्याला आली होती. त्यामुळे आघाडी धर्म म्हणून राष्ट्रवादीने ही जागा लढवणे अपेक्षित होते; परंतु येथेही शरद पवारांनी नेहमीप्रमाणे धक्कातंत्राचा अवलंब केल्याचे दिसते. शरद पवारांचे राजकारण अनेकदा बुचकळ्यात टाकणारे असते. पुण्यातही राष्ट्रवादी उमेदवाराविरोधात माघार घेऊन त्यांनी एकप्रकारे महायुतीला सहाय्य केल्याचे दिसून आले. त्यामुळे काँग्रेसचा संताप होणे स्वाभाविकच होते.

'पुणे विभाग विधान परिषद निवडणुकीसाठी मी अर्ज दाखल केला होता. मात्र, या निवडणुकीत कोणत्याही प्रकारचा घोडेबाजार होऊ नये, लोकशाही मूल्यांचे रक्षण व्हावे आणि निवडणूक प्रक्रियेची पवित्रता अबाधित राहावी, या व्यापक भूमिकेतून पक्षाने निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या विनंतीला मान देत तसेच शरदचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनानुसार हा निर्णय घेतला आहे,' असे श्रीकांत पाटील यांनी नंतर स्पष्ट केले. पवारांचे राजकारण कसे आणि कुठे फिरते, याचा हा एक उत्तम नमुना आहे.२०१२ मध्ये जेव्हा राज्यसभेच्या जागांसाठी निवडणुका होत्या, तेव्हा विक्रम काकडे यांचे वडील संजय काकडे यांनी अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरला होता. त्यावेळी शरद पवार यांनी त्यांना उमेदवारी मागे घेण्याची विनंती केली होती. त्यानंतर संजय काकडे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. २०१४ च्या राज्यसभेच्या निवडणुकीत मात्र संजय काकडे यांनी उमेदवारी अर्ज कायम ठेवला आणि ते निवडूनही आले होते. २०१२ मध्ये काकडे यांनी दाखवलेल्या सामंजस्याची जाणीव ठेवतच शरद पवार यांनी श्रीकांत पाटील यांना माघार घ्यायला लावली आणि तेव्हाच्या सहकार्याची परतफेड केली, असे म्हटले जाते. ते काहीही असले, तरी दुहेरी भूमिका घेण्याचे त्यांचे कौशल्य जबरदस्तच म्हणता येईल. अजित पवार यांच्या अचानक झालेल्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची धुरा त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी अत्यंत सक्षमपणे सांभाळली आहे. सुनेत्रा पवार, जय पवार आणि पार्थ पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने पुण्यातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघावर आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. पक्षांतर्गत बंडखोरी शमवून आणि विरोधकांशी पडद्याआड तडजोड करून मिळवलेला हा विजय महायुतीच्या संघटन कौशल्याची आणि राजकीय ताकदीची साक्ष देतो. या विजयामुळे पुणे जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघावरील महायुतीची पकड पुन्हा एकदा अत्यंत मजबूत झाली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि विधानसभा निवडणुकांसाठी महायुतीला यामुळे मोठा फायदा मिळणार आहे. या संपूर्ण निवडणुकीवरून हे स्पष्ट होते की, पुणे विधान परिषद निवडणूक केवळ मतांच्या तांत्रिक गणितापुरती मर्यादित नव्हती, तर ती जुने राजकीय ऋणानुबंध, कौटुंबिक तडजोडी आणि भविष्यातील राजकीय डावपेचांची एक उत्तम झलक होती.

# स्मारक उभारणी प्रकरणात बाळराजे आवारे पाटील यांना जामीन

## आंदोलक विद्यार्थी,युवकांवर अत्याचार करणाऱ्या केंद्र सरकार विरोधात माकपची निदर्शने

■ परळी / प्रतिनिधी

दिल्लीतील जंतर-मंतर येथे शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणाऱ्या आंदोलक विद्यार्थी, युवकांवर पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठीचार्ज या हिंसक कारवाईचा तीव्र निषेध करण्यासाठी आणि केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तातडीने राजीनामा द्यावा, या प्रमुख मागण्यांसाठी गुरुवार दि 23 रोजी भारतिय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी), बीड जिल्ह्याच्या वतीने परळी, अंबाजोगाई, माजलगाव, धारूर, सिरसाळा (ता. परळी वै.) या ठिकाणी निदर्शने करण्यात आली.

जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी रस्त्यावर उतरून केंद्र सरकारच्या दडपशाही धोरणाचा निषेध नोंदवला.

**आंदोलनादरम्यान केंद्र सरकार आणि शिक्षण मंत्र्यांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली . लोकशाही मार्गाने आपल्या मागण्या मांडणाऱ्या आंदोलका विद्यार्थी युवकांवर असा अमानुष हल्ला करणे म्हणजे लोकशाहीचा गळा घोटण्यासारखे आहे. शिक्षण क्षेत्रातील गोंधळ आणि आंदोलकांवर झालेला अन्याय याला पूर्णपणे केंद्रीय शिक्षण मंत्री जबाबदार असून त्यांनी पदावर राहण्याचा नैतिक अधिकार गमावला आहे, त्यामुळे त्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी या वेळी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाकडून करण्यात आली.**





# आंदोलक विद्यार्थी,युवकांवर अत्याचार करणाऱ्या केंद्र सरकार विरोधात माकपची निदर्शने





■ परळी / प्रतिनिधी

दिल्लीतील जंतर-मंतर येथे शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणाऱ्या आंदोलक विद्यार्थी, युवकांवर पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठीचार्ज या हिंसक कारवाईचा तीव्र निषेध करण्यासाठी आणि केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तातडीने राजीनामा द्यावा, या प्रमुख मागण्यांसाठी गुरुवार दि 23 रोजी भारतिय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी), बीड जिल्ह्याच्या वतीने परळी, अंबाजोगाई, माजलगाव, धारूर, सिरसाळा (ता. परळी वै.) या ठिकाणी निदर्शने करण्यात आली.

जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी रस्त्यावर उतरून केंद्र सरकारच्या दडपशाही धोरणाचा निषेध नोंदवला.

आंदोलनादरम्यान केंद्र सरकार आणि शिक्षण मंत्र्यांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली . लोकशाही मार्गाने आपल्या मागण्या मांडणाऱ्या आंदोलका विद्यार्थी युवकांवर असा अमानुष हल्ला करणे म्हणजे लोकशाहीचा गळा घोटण्यासारखे आहे. शिक्षण क्षेत्रातील गोंधळ आणि आंदोलकांवर झालेला अन्याय याला पूर्णपणे केंद्रीय शिक्षण मंत्री जबाबदार असून त्यांनी पदावर राहण्याचा नैतिक अधिकार गमावला आहे, त्यामुळे त्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी या वेळी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाकडून करण्यात आली.

## परळीत मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त मोफतनेत्र तपासणी व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

पान १ वरुन

या आरोग्यविषयक उपक्रमातून गरजू नागरिकांना मोठा लाभ मिळणार आहे. परळीत मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत नेत्र तपासणी व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर शनिवार, दि. 25 जुलै 2026 रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत हनुमान मंदिर, पद्मावती गल्ली, परळी वैजनाथ येथे आयोजित करण्यात आले आहे. शिबिरात नागरिकांची आधुनिक पद्धतीने मोफत नेत्र तपासणी करण्यात येणार असून, गरजू रुग्णांना अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या शिबिरासाठी नाव नोंदणी आवश्यक असून, इच्छुक नागरिकांनी राहुल केंद्रे – ८७६६८३७२८२, प्रितम बोरा – ९४०५८१४८८८, मनोज तवले – ९११२३०९५४० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या शिबिरासाठी नाव नोंदणी करणे अनिवार्य असून, गरजू नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या आरोग्यसेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक सौ. अश्विनी राहुल केंद्रे (नगरसेविका, नगरपरिषद) व राहुल रामचरण केंद्रे (युवा नेते, भाजपा) यांनी केले आहे.

## शासकीय व सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासासाठी सुवर्णसंधी

■ नवी मुंबई प्रतिनिधी

राज्यातील सार्वजनिक आणि शासनमान्य ग्रंथालयांचा सर्वांगीण विकास साधण्याच्या उद्देशाने, भारत सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान (कोलकाता) यांच्या वतीने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी विविध 'समान व असमान निधी' (Matching & Non-Matching Schemes) योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने या योजनांचा लाभ घेण्यासाठी राज्यातील इच्छुक व पात्र शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांकडून विहित नमुन्यातील प्रस्ताव आमंत्रित करण्यात आले आहेत. ग्रंथालयांच्या पायाभूत सुविधा बळकट करण्यासोबतच वाचकांसाठी विविध आधुनिक सुविधा निर्माण करण्यासाठी ही एक मोठी संधी उपलब्ध झाली असून, ग्रंथालयांनी दिलेल्या मुदतीत आपले परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन प्र. ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे.

या कल्याणकारी योजनांतर्गत प्रामुख्याने दोन स्तरांवर अर्थसाहाय्य पुरविले जाणार आहे. पहिल्या प्रकारात 'समान निधी योजने' (Matching Schemes) अंतर्गत ग्रंथालयांच्या इमारतीचे बांधकाम व विस्तारासाठी कमाल २५ लाख रुपयांपर्यंतच्या अर्थसाहाय्य योजनेचा समावेश आहे. याव्यतिरिक्त इतर समान निधी योजनांचा लाभ थेट केंद्रीय पद्धतीने दिला जात असल्याने, इतर योजनांसाठी राज्य स्तरावर स्वतंत्र प्रस्ताव सादर करू नयेत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. दुसऱ्या प्रकारात 'असमान निधी योजने' (Non-Matching Schemes) अंतर्गत ग्रंथालयांचा दर्जा उंचावण्यासाठी विविध व्यापक योजना राबविल्या जात आहेत. यामध्ये ग्रंथालय सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना ग्रंथ, साधनसामग्री, फर्निचर, इमारत बांधकाम व विस्तार यासाठी भरीव आर्थिक मदत दिली जाणार असून, फर्निचर खरेदीसाठी ४ लाख रुपये आणि इमारत बांधकामासाठी १० ते १५ लाख रुपयांपर्यंतचे एकवेळचे विशेष अर्थसाहाय्य अनुज्ञेय राहील.

## मनपा मुख्यालयात अजित पवार जयंतीनिमित्त अभिवादन

■ नवी मुंबई प्रतिनिधी

महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजित अनंतराव पवार यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापालिका मुख्यालयात ॲम्फिथिएटर येथे अजित अनंतराव पवार यांच्या प्रतिमेस महापौर सुजाता पाटील यांच्या हस्ते पुष्पमालिका अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी उपमहापौर दशरथ भगत, महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनीही प्रतिमापूजन करून अभिवादन केले.



याप्रसंगी प्रभाग समिती अध्यक्ष रूपाली भगत, शैला पाटील, पाणीपुरवठा समिती सभापती रविकांत पाटील, विधी समिती सभापती ॲड.सायली शिंदे, नगरसेविका ॲड. भारती पाटील, स्विकृत नगरसेवक बंडू केणी तसेच प्रशासन विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे, शहर अभियंता शिरीष आरदवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिग्विजय चव्हाण, मुख्य लेखा परीक्षक राजेंद्र गाडेकर, मालमत्ताकर विभागाचे उपआयुक्त डॉ.अमोल पालवे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे, माजी नगरसेवक भरत जाधव तसेच इंदर शेंडगे, प्रसाद घोरपडे, अश्विन अगमकर, अनिता नायडू, कविता शास्त्री, संतोष आहेर, किरण कारंडे, आदित्य ढेबे आणि इतर अधिकारी, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. माजी उपमुख्यमंत्री अजित अनंतराव पवार यांचा जन्म दि.२२ जुलै १९५९ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथे झाला. आपले कर्तृत्व, निर्णयक्षमता, प्रशासनावरील पकड आणि विकासाभिमुख दृष्टीकोनामुळे त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात एक प्रभावी, कणखर आणि लोकप्रिय नेता म्हणून स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांचा जनतेशी असलेला दृढ संपर्क, प्रभावी नेतृत्व आणि विकासकामांप्रती असलेली बांधिलकी यामुळे त्यांना व्यापक लोकसमर्थन लाभले.सन १९९१ मध्ये बारामती लोकसभा मतदारसंघातून ते प्रथमच खासदार म्हणून निवडून आले. त्यानंतर त्यांनी बारामती विधानसभा मतदारसंघाचे सलग आठ वेळा प्रतिनिधित्व केले. अजित अनंतराव पवार यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून एकूण सहा वेळा कार्यभार सांभाळला. याशिवाय त्यांनी वित्त व नियोजन, जलसंपदा, ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क, अन्न व नागरी पुरवठा, अल्पसंख्याक विकास, तसेच क्रीडा व युवक कल्याण यांसारख्या अनेक महत्त्वाच्या खात्यांचे मंत्री म्हणून कार्यक्षमतेने जबाबदारी पार पाडली. राज्याचा अर्थसंकल्प त्यांनी ११ वेळेस विधान मंडळास सादर केला. तसेच जुलै २०२२ ते जून, २०२३ या काळात त्यांनी विधानसभेचे विरोधी पक्षनेते म्हणूनही काम पाहिले.त्यांच्या कार्यकाळात ग्रामीण व शहरी भागातील रस्त्यांचा विकास, पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम करणे, औद्योगिक गुंतवणुकीला चालना देणे, सिंचन प्रकल्पांना गती देणे आणि विकासाभिमुख प्रशासकीय निर्णय राबविणे यांसारख्या अनेक महत्त्वपूर्ण उपक्रमांना प्राधान्य देण्यात आले. प्रशासनातील त्यांची निर्णयक्षमता, कार्यतत्परता आणि विकासाभिमुख दृष्टी यामुळे त्यांनी राज्याच्या सर्वांगीण प्रगतीत मोलाचे योगदान दिले. राजकीय वर्तुळात तसेच जनसामान्यांमध्ये ते प्रेमाने 'अजितदादा' या नावाने ओळखले जात. त्यांच्या स्पष्टवक्तेपणा, कठोर परिश्रम, शिस्तप्रिय स्वभाव आणि विकासासाठीच्या अखंड धडपडीमुळे त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणावर एक ठसा उमटवला. २८ जानेवारी, २०२६ रोजी बारामती जि. पुणे येथे त्यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा माहितीफलक याठिकाणी प्रदर्शित करण्यात आला होता.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# शाळा ही माझी पंढरी, विद्यार्थी माझा विठ्ठल

## वर्गाच्या गाभाऱ्यातच रंगतोय विठ्ठल भेटीचा सोहळा



पंढरपूर! हे नाव उच्चारताक्षणीच डोळ्यांसमोर उभे राहते ते भक्तीच्या महासागरात न्हाऊन निघालेले वारकऱ्यांचे विलोभनीय रूप. आम्हा शिक्षकांसाठी आमची शाळा हे केवळ विटा-दगडांचे बांधकाम नसून ते 'ज्ञानमंदिराचे गर्भगृह' आहे. आणि या गर्भगृहात दररोज जो विठ्ठल मला भेटतो, तो दुसरा तिसरा कोणी नसून माझा 'विद्यार्थी' आहे. या विद्यार्थीरूपी विठ्ठलाच्या भक्तीत ज्ञानरसाने न्हाऊन निघालेले आम्ही सामान्य वारकरी!

शिक्षकाची ही 'जीवनवारी' वारीच्या परंपरेप्रमाणेच पवित्र आहे. आमच्या या ज्ञानपंढरीत माझ्या हातांत भौतिक टाळ-मृदंग नसले, तरी माझ्याकडे 'संस्कारांची टाळ' आहे, जिचा नाद विद्यार्थ्यांच्या मनात शिस्त रुजवतो. आमच्या मायेचा आवाज म्हणजे तो 'प्रेमाचा मृदंग' आहे, ज्याच्या प्रत्येक थपकेवर विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा ताल धरला जातो. खडूच्या सहाय्याने आम्ही फळ्यावर जे विचारांचे सूर उमटवतो, ती आमची 'ज्ञानाची पेटी' आहे, जिच्या सुरावटीतून विद्यार्थ्यांच्या बुद्धीला नवी दिशा




मिळते. वर्गात होणारा आमचा हा संवाद म्हणजे केवळ अध्यापन नसून, तो विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी केलेला एक 'ज्ञानयोग' आहे.

शाळा हे आमच्यासाठी वाळवंटातल्या संजीवनीसारखे तीर्थक्षेत्र आहे, जिथे हातात 'पुस्तकाची पताका' घेऊन मी संस्कारांची वाट चालत असतो.

वर्गातले ते लहानसे, निरागस डोळे जेव्हा माझ्याकडे पाहतात, तेव्हा मला ते डोळे सावळ्या विठ्ठलाच्या डोळ्यांसारखे 'टपोरे आणि भावपूर्ण' वाटतात.

एक कवी म्हणतो तसे—
"जेव्हा येतात लेकरं सुखदुःख वाटायला...!!
त्यांच्या रूपात विठ्ठल रोज येतो भेटायला...!!"

'अ' उच्चारताना आम्हाला आद्यशक्तीचा प्रारंभ जाणवतो, तर 'गुणाकार' शिकवताना मला ज्ञानाचा प्रसाद वाटत असल्याचा भास होतो. एखादे मूल मागे पडले की मनात निर्माण होणारी खिन्नता ही भक्तीच्या वाटेवरच्या एका 'परीक्षेसारखी' असते, जिथे मला त्याच्या जवळ जाऊन त्याच्या मनातील अज्ञान दूर करावे लागते. शाळेचा शेवटचा तास संपतो, दिवस मावळतो, पण त्या मुलांच्या चेहऱ्यावरचे स्मित घेऊन मी जेव्हा घरी परततो, तेव्हा मला 'विठ्ठलाची प्रचिती' आलेली असते. माझ्यासाठी कोणतीही वेगळी एकादशी नाही, तर विद्यार्थ्यांच्या यशात उमटलेले हास्य हीच माझी खरी 'वारी' आहे. शेवटी, ईश्वराकडे एकच मागणी आहे—
"हे ज्ञानमूर्ती विठ्ठला, माझ्या या ज्ञानवारीला तुझ्या आशीर्वादाची सावली लाभू दे आणि माझ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या यशात मला तुझेच दर्शन घडून दे!"

- विलास माणिक ठोंबरे

# भारत सरकारकडून डॉ. आशिषकुमार कटारिया यांना चौथे प्रॉडक्ट पेटंट; गांधी महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा



**देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे):**

श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ, कडा या शतकपूर्ती करणाऱ्या नामांकित शैक्षणिक संस्थेअंतर्गत कार्यरत गांधी महाविद्यालय, कडा येथील रसायनशास्त्र विभागाचे प्रा. डॉ.आशिषकुमार पी.कटारिया यांना भारत सरकारच्या भारतीय बौद्धिक संपदा कार्यालयाकडून (Indian Patent Office) त्यांच्या संशोधनासाठी चौथे भारतीय प्रॉडक्ट पेटंट प्रदान करण्यात आले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

"Novel N-Substituted-4-(3,5-Dimethylphenyl)Thiazol-2-Amine Compounds and Process for Synthesizing Thereof" या संशोधनाला भारत सरकारकडून पेटंट मंजूर झाले आहे. हे संशोधन सेंद्रिय संश्लेषण (Synthetic Organic Chemistry) क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदान मानले जात आहे.

डॉ. कटारिया हे सिंथेटिक ऑर्गेनिक केमिस्ट्री क्षेत्रातील उदयोन्मुख संशोधक म्हणून ओळखले जातात. त्यांचे संशोधन ChemistrySelect, Molecular Diversity, New Journal of Chemistry तसेच Polycyclic Aromatic Compounds यांसारख्या उच्च प्रभावांक (High Impact Factor) असलेल्या आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले आहे.

आजपर्यंत त्यांनी ४० हून अधिक आंतरराष्ट्रीय संशोधन निबंध प्रकाशित केले असून, त्यांच्या सातत्यपूर्ण संशोधन कार्यामुळे रसायनशास्त्र आणि औषधनिर्मिती क्षेत्राला महत्त्वपूर्ण दिशा मिळत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

डॉ. कटारिया यांच्या नावावर आतापर्यंत चार प्रॉडक्ट पेटंट आणि एक डिझाईन पेटंट, अशी एकूण पाच पेटंट नोंद झाली असून, संशोधन क्षेत्रातील ही उल्लेखनीय कामगिरी मानली जात आहे.

कमी वयात कठोर परिश्रम, सातत्य आणि संशोधनाची जिद्द यांच्या बळावर डॉ. आशिषकुमार कटारिया यांनी मिळवलेले हे यश युवा संशोधकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल गांधी महाविद्यालय, कडा येथील प्राचार्य डॉ. जे. एम. भंडारी यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला आणि पुढील संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या यशाबद्दल श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# परळी आणि सिरसाळ्यात कडकडीत बंद ; दिल्लीतील विद्यार्थी लाठीचार्जविरोधात वंचित आक्रमक



**परळी/सिरसाळा :**

दिल्ली येथील जंतर-मंतर मैदानावर आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांनी राज्यव्यापी बंदची हाक दिली. या आवाहनाला प्रतिसाद देत बीड जिल्ह्यातील परळी आणि सिरसाळा परिसरात आज कडकडीत बंद पाळण्यात आला. दिवसभर कडकडीत बंद पाळण्यात आला होता. विशेषत सिरसाळ्यात आठवडी बाजारावर बाजार असतो हा आठवडी बाजार देखील बंद होता . शेतकरी,व्यावसायिक , व्यापाऱ्यांनी सदरील बंद ला उस्फूर्त पणे प्रतिसाद दिला.सिरसाळा येथे दर गुरुवारी भरणारा मुख्य आठवडी बाजार आज पूर्णपणे ठप्प होता. या आंदोलनाला पाठिंबा देत स्थानिक व्यापारी, शेतकरी आणि ग्राहकांनी बाजारात येणे टाळले, ज्यामुळे बाजारपेठेत शुकशुकाट पाहायला मिळाला.

**व्यापाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी सकाळीच रस्त्यावर उतरून शांततेच्या मार्गाने दुकाने बंद ठेवण्याचे आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद देत परळी आणि सिरसाळ्यातील सर्व लहान-मोठ्या व्यावसायिकांनी आपली प्रतिष्ठाने स्वतःहून बंद ठेवली आणि विद्यार्थ्यांवरील कारवाईचा जाहीर निषेध केला.याच बरोबर सदरील अंदोलनाचे समर्थन व केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा देण्याची मागणी अंदोलकांनी दिलेल्या निवेदनात केली आहे.

# वैभव सूर्यवंशी सर्वात तरुण टी-20 आंतरराष्ट्रीय अर्धशतक झळकावणारा खेळाडू



**हरारे |** पहिल्या टी२० सामन्यात भारताने झिम्बाब्वेला ७ गडी राखून पराभूत करून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. हरारे येथे प्रथम फलंदाजी करताना झिम्बाब्वेने २० षटकांत ७ गडी गमावून १२५ धावा केल्या.

प्रत्युत्तरात, भारताने ३ गडी गमावून १३.२ व्या षटकातच लक्ष्य गाठले. वैभव सूर्यवंशीने वयाच्या १५ वर्षे आणि ११८ दिवसांत अर्धशतक झळकावून इतिहास रचला. त्याने टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यात अर्धशतक झळकावणारा जगातील सर्वात तरुण फलंदाज होण्याचा मान मिळवला आणि जिब्राल्टरच्या लुईस ब्रूसचा विक्रम मोडला, ज्याने वयाच्या १६ वर्षे आणि ५६ दिवसांत हा पराक्रम केला होता.

श्रेयस अय्यरच्या कर्णधारपदाखाली भारताचा हा पहिलाच विजय होता. यापूर्वी, त्यांना आयर्लंड मालिका २-० आणि इंग्लंड मालिका ४-० ने गमवावी लागली होती. सामन्याचे स्कोअरकार्ड...

माधेवेरेने सर्वाधिक ३९ धावा केल्या.

वेस्ली माधेवेरेने सर्वाधिक ३९ धावा केल्या. अखेरीस, तदिवानाशे मरुमणीने नाबाद २७ धावा जोडून संघाला १०० धावांच्या पुढे नेले. भारतासाठी मयंक यादव आणि प्रिन्स यादव यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. मयंकने डावाच्या पहिल्याच चेंडूवर ब्रायन बेनेटला आणि त्यानंतर डायोन मायर्सला बाद केले. शिवम दुबे आणि रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. वेस्ली माधेवेरे धावबाद झाला.

# रात्रंदिवस अभ्यास, पण निकालाने धक्का : बीडच्या विद्यार्थ्यांच्या याचिकेवर हायकोर्टाची NTA ला नोटीस

**बीड |** देशभरात नीट परीक्षेवरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर आता बीडमधील दोन विद्यार्थ्यांच्या निकालामुळे नवीन प्रश्न निर्माण झाले आहेत. अपेक्षेपेक्षा अत्यंत कमी गुण मिळाल्याचा दावा करत विद्यार्थ्यांनी औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. या प्रकरणाची दखल घेत न्यायालयाने राष्ट्रीय परीक्षा संस्था (NTA) ला नोटीस बजावत संबंधित विद्यार्थ्यांच्या मूळ उत्तरपत्रिका न्यायालयात सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

**■ नेमका प्रकार काय? गुणांमधील मोठी तफावत**

नीट परीक्षेचा पेपर फुटल्यानंतर NTA ने पुन्हा परीक्षा घेतली आणि १६ जुलै रोजी या पुनर्परीक्षेचा निकाल जाहीर केला. मात्र, या निकालाने बीडमधील गवते कुटुंबाला मोठा धक्का दिला.

पहिला विद्यार्थी (सोहम गवते): अधिकृत आन्सर की आणि स्वतःची 'ओएमआर शीट' तपासल्यानंतर सोहमला किमान ५२२ गुण मिळण्याची खात्री होती. मात्र, प्रत्यक्ष स्कोअरकार्डवर त्याला केवळ ९५ गुण देण्यात आले.

दुसरी विद्यार्थिनी: याच भागातील एका विद्यार्थिनीला तब्बल ७०२ पेक्षा अधिक गुण मिळण्याची अपेक्षा




असताना, निकालात तिला अवघे ८७ गुण मिळाल्याचे समोर आले आहे.

**■ हायकोर्टाचा NTA ला दणका**

आपल्या गुणांमध्ये प्रचंड मोठी गडबड झाल्याचे लक्षात येताच शुभम गवते या विद्यार्थ्याने औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली. या प्रकरणी आज न्यायालयात सुनावणी पार पडली. याचिकाकर्त्यांचे वकील महेंद्र पंडितराव गंडले यांनी दिलेल्या माहितीनुसार, न्यायालयाने या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून NTA ला नोटीस बजावली आहे. तसेच, येत्या एका आठवड्याच्या आत या दोन्ही विद्यार्थ्यांच्या मूळ उत्तरपत्रिका कोर्टात जमा करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. या कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतरच पुढील सुनावणी होणार आहे.

**■ कुटुंबीयांवर कोसळला दुःखाचा डोंगर**

नीट परीक्षेत चांगले यश मिळेल या आशेवर असलेल्या गवते कुटुंबाला निकालाने मोठा मानसिक धक्का दिला. हा निकाल पाहिल्यानंतर विद्यार्थी कोणाशीही बोलण्याच्या मनस्थितीत नव्हता.

मुलाच्या कष्टांबद्दल सांगताना त्याच्या आईला अश्रू अनावर झाले. त्या म्हणाल्या, "माझ्या मुलाने रात्रंदिवस एक करून अभ्यास केला. तो सलग दोन-तीन तासांपेक्षा जास्त कधी झोपला नाही, वेळेवर जेवण केले नाही. आजारी असतानाही त्याने पुस्तके खाली ठेवली नाहीत. पण या निकालाने त्याच्या सर्व मेहनतीवर पाणी फेरले." तर, 'आन्सर की' आणि निकालामध्ये प्रचंड तफावत असल्याने आपण न्यायासाठी थेट हायकोर्टात लढा देणार असल्याची ठाम भूमिका विद्यार्थ्याच्या वडिलांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना मांडली होती. ज्याला आता कोर्टाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.




## स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

# जबरी चोरी, घरफोडी व सोलर प्लांटवर दरोडा टाकणारी आंतरजिल्हा टोळी गजाआड!



### ६.७९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

### धारूर, केज आणि नेकणूर भागातील गुन्हे उघडकीस



- मुख्य आरोपी प्रकाश उर्फ गुड्या शाहजी काळे याच्याकडे अधिक चौकशी केली असता, त्याने आपल्या साथीदारांच्या मदतीने खालील गुन्हे केल्याची कबुली दिली
- आडस येथून एका आखाड्यात झोपलेल्या इसमास मारहाण करून १२ शेळ्यांची चोरी.
- केज तालुका: कानडी माळी व मत्साजोग येथील सोलर प्लांटमधून अर्थिंग रॉड व वायरची चोरी.
- नेकणूर हद्द: येळंबघाट येथे रात्रीच्या वेळी घरफोडी.
- पोलीस कारवाईत गुन्ह्यात वापरण्यात आलेले हत्यार, स्कॉर्पिओ वाहन असा एकूण ६,७९,४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**विशेष वृत्त | नितीन ढाकणे**

स्थानिक गुन्हे शाखा, बीड (LCB) पथकाने मोठी कामगिरी करत परिसर हादरवून सोडणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश केला आहे. जबरी चोरी, घरफोडी आणि सोलर प्लांटवरून तांब्याची वायर व अर्थिंग रॉड चोरणाऱ्या अट्टल गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले असून त्यांच्याकडून वाहनासह तब्बल ६ लाख ७९ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस स्टेशन केज येथील गु.र.नं ४६१/२०२६ अन्वये दाखल गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेताना, पोउपनि महेश विघ्ने व पथकाला गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली. आरोपी प्रकाश उर्फ गुड्या काळे हा त्याच्या साथीदारांसह पांढऱ्या रंगाच्या स्कॉर्पिओ गाडीतून (क्र. MH 12 HF 4245) केज येथून चोरलेले कॉपर विकण्यासाठी कळंबच्या दिशेने जात होता.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी हॉटेल कुलस्वामिनीजवळ (मोहा रस्ता) सापळा रचला. पोलिसांना पाहून दोन आरोपींनी पोलिसांना धक्का देऊन पळ काढला, तर चार आरोपींना ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले.

प्रकाश उर्फ गुड्या शाहजी काळे (रा. मोहा पारधी वस्ती, ता. कळंब, जि. धाराशिव), शहाजी शेषेराव पवार (रा. मोहा, ता. कळंब), संतोष बारीकराव शिंदे (रा. मोहा, ता. कळंब), दिनेश नागनाथ काळे (रा. कुरनेनगर, ता. जि. धाराशिव), महेश शिवाजी पवार (रा. मोहा, ता. कळंब), अशोक हिम्मत शिंदे (रा. मोहा, ता. कळंब)

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक (अंबाजोगाई) श्रीमती चेतना तिडके आणि उपविभागीय पोलीस अधिकारी (केज) व्यंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोउपनि महेश विघ्ने, पोहवा घोडके, जफर पठाण, दिलीप गित्ते, भागवत शेलार, दिपक खांडेकर, अर्जुन यादव, मपोहवा मुंडे, पो.अं. अश्विनकुमार सुरवसे आणि चापोहवा गणेश मराडे यांच्या पथकाने केली.

# विद्यार्थांवरील लाठीहल्ल्याचा निषेधार्थ परळीत माकपच्या कार्यकर्त्यांनी केली निदर्शने

## केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी

**परळी | प्रतिनिधी**

दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी आंदोलकांवर झालेल्या अमानुष लाठीहल्ल्याचा निषेध करण्यासाठी आणि केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी गुरुवारी २३ जुलै २०२६ परळी तहसील कार्यालयावर निदर्शने करण्यात आली.

दिल्लीत जंतर-मंतर येथे आपल्या न्याय्य मागण्यांसाठी शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणाऱ्यां विद्यार्थ्यांवर पोलिस प्रशासनाने बळाचा वापर करत लाठीमार केला. त्या घटनेत अनेक विद्यार्थी जखमी झाले आहेत. या घटनेचे देशभरात तीव्र पडसाद उमटत आहेत. माकपने या लाठीहल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. मागील एक महिन्या पासुन देशभरात केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा या मागणीसाठी आंदोलन केले जात आहेत. दिल्लीत जंतर मंतर येथे शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना पोलीसांनी मारहाण करुण जखमी केले आहे. त्यात अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. तरीही विद्यार्थ्यांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याच्या निषेधार्थ परळी तहसील कार्यालयावर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने निदर्शने करण्यात आली. मागण्यांचे निवेदन विभागीय अधिकारी अरविंद लाटकर यांना देण्यात आले. यावेळी माकपचे जेष्ठ नेते कॉ पांडुरंग राठोड, ॲड बी जी खाडे, शाखा सचिव कॉ किरण सावजी, कॉ परमेश्वर गित्ते, कॉ प्रकाश चव्हाण, कॉ जालिंदर गिरी, चंद्रशेखर सरकटे, शेख जावेद आदींची उपस्थिती होती.





# रेणापूर येथील समाधान शिबिरात विविध योजनेतील अनेकांना प्रत्यक्ष लाभाचे वितरण

## शासकीय योजनेतून एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये-आ. कराड

**लातूर |** देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री विकासपुरुष देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वातील शासनाने अठरापगड जाती धर्मांना, गोरगरीब सर्वसामान्य माणसांला केंद्रबिंदू मानून अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या. या योजने पासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये त्यांना प्रत्यक्ष लाभ मिळावा यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या समाधान शिबिराचे आयोजन केले असून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जनतेच्या अडीअडचणी, तक्रारी, प्रश्नांची सोडवणूक करून विविध योजनेचा लाभ देऊन सर्वसामान्य जनतेचे समाधान करावे असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार साहेब यांच्या जयंती निमित्ताने शासनाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियाना अंतर्गत लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे रेणापूर येथे आयोजित समाधान शिबिराचे उद्घाटन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी व इतर अनेकांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. या समाधान शिबिर प्रसंगी विविध गावचे लोकप्रतिनिधी, लाभार्थी, महिला पुरुष



मोठ्या संख्येने उपस्थित होते. या समाधान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

लातूर ग्रामीण मतदार संघाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना शुभेच्छा देऊन स्वर्गीय अजितदादा पवार यांना आदरांजली अर्पण करून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदीजीच्या नेतृत्वात देशाने आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याने विकास कामात एक वेगळी उंची गाठली असून त्यांनी सुरू केलेल्या विविध जनकल्याणकारी योजना पात्र आणि गरजू लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ घेण्यासाठी समाधान शिबिराचा निश्चितपणे फायदा होईल.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी आत्तापर्यंतची सर्वात मोठी ऐतिहासिक कर्जमाफी जाहीर केली असून याचा ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. तर महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी क्रांतिकारी निर्णय घेऊन मुख्यमंत्री बळीराजा पाणंद शेत रस्ता योजना सुरू केली या योजनेतून लातूर ग्रामीण मतदार संघात येत्या दोन वर्षात एकही शेत रस्ता शिल्लक राहणार नाही प्रत्येक शेतकऱ्यांना मजबूत आणि पक्का रस्ता देण्याचे काम शासनाच्या वतीने हाती घेण्यात आले असल्याचे आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

गावागावात शिव रस्त्याची कामे करताना कोणीही कोणाचीही आडवणूक करू नये असे सांगून आ. रमेशआप्पा कराड यांनी आडवणूक करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या शासनाच्या सूचना असल्याने एकही शेतरस्ता अतिक्रमित राहणार नाही सर्व रस्ते मोकळे होतील. कबाले नसल्यामुळे अनेकांना घरकुल योजनेचा लाभ मिळत नव्हता या पुढील काळात एकही पात्र लाभार्थी कबाल्यापासून वंचित राहणार नाही अशी माहिती देऊन आ. रमेशआप्पा कराड यांनी शासनाच्या योजनेपासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही. पात्र लाभार्थ्यांचे जोपर्यंत समाधान होणार नाही तोपर्यंत हे काम थांबणार नाही असेही त्यांनी बोलून दाखविले.

प्रारंभी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे आणि संदीप कुलकर्णी यांनी एकाच छताखाली शासनाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या शेतकरी सन्मान निधी, मोफत वीज पुरवठा, सोलर पंप, लाडकी बहीण, मोफत राशन, घरकुल, विहिरी, लखपती दीदी योजना यासह सर्व योजनाचा पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची समाधान शिबिराच्या माध्यमातून सोय करण्यात आली असल्याची माहिती दिली. प्रारंभी तहसीलदार सौदागर तांदळे यांनी समाधान शिबिर आयोजनामागची भूमिका विषद करून या शिबिरात उभारण्यात आलेल्या विविध स्टॉलवर आपल्या अडीअडचणी मांडून त्या सोडवून घ्याव्यात असे बोलून दाखविले.

रेणापूर येथील समाधान शिबिरात महिला शेतकरी प्रमाणपत्र, रहिवासी आणि उत्पन्न प्रमाणपत्र, जिवंत सातबारा, डिजिटल सातबारा, प्रलंबित फेरफार, आयुष्यमान भारत कार्ड, गाव नकाशे, ट्रॅक्टर वाटप, सांगायो पात्र लाभार्थ्यांना मंजुरीपत्र, डिजिटल शिधापत्रिका, लेक लाडकी योजनेचा हप्ता, लखपती दीदी योजनेचे पत्र, बचत गटांना कर्जमुक्ती प्रमाणपत्र, बेबी केअर किट यासह विविध योजनेतील पात्र लाभार्थ्यांना आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते मंजुरी पत्राचे व प्रत्यक्ष लाभाचे वाटप करण्यात आले. शेवटी तहसीलदार प्रशांत थोरात यांनी आभार मानले.

या कार्यक्रमास रेणापूर, लातूर तालुक्यातील विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी अनेक गावातील नागरिक, महिला पुरुष मोठ्या संख्येने होते. कार्यक्रम स्थळी आगमन होताच आ. कराड यांचे शाळकरी विद्यार्थ्यांनी लेझीम आणि विविध वाजंत्रीच्या गजरात जोरदार स्वागत केले.